# M. A. INDIAN MUSIC Examination
## (Classical Vocal and Instrumental)
## SEMESTER II

Practical Paper I (Viva) Credits : 4 Maximum Marks: 100 (80+20)

Course outcomes:

- विद्यार्थ्याला अभ्यासक्रमातील राग ओळखता येतील.
- विद्यार्थ्याला किमान 5 ताना तयार करून आकारात गाता येतील.
- विद्यार्थ्याला विहित रागांचा तुलनात्मक अभ्यास करता येईल.
- विद्यार्थ्याला विहित रागांगांचे स्पष्टीकरण करता येईल.

विद्यार्थ्यांनी विस्तृत अध्ययनाच्या रागांत संपूर्ण गायकीसह विलंबित व द्रुत ख्याल, तर संदर्भ रागांमध्ये रागाचे साधारण स्वरूप व छोटा ख्याल गायकीसह तयार करावा.

| क्र. | अंग | विस्तृत | संदर्भ |
|---|---|---|---|
| 1. | आसावरी | जौनपुरी | गांधारी |
| 2. | तोडी | गुजरी तोडी | सालगवराळी तोडी |
| 3. | मल्हार | सूर मल्हार | मेघ मल्हार |
| 4. | काफी | बागेश्री | सिंदुरा |
| 5. | पूर्वी | वसंत | परज |

याव्यतिरिक्त पुढील सर्व रागांमध्ये छोटेख्याल गायकीसह तयार करावेत व कोणत्याही दोन रागांत विलंबित ख्याल विस्तृत गायकीसह तयार करावेतः

1. पूरियाकल्याण 2. चंद्रकौंस 3. चारुकेशी 4. गुणकरी.

वरील 14 पैकी कोणत्याही रागांमध्ये 1 धृपद, 1 धमार व 1 तराणा व 1 त्रिवट तयार करावे.

तालः ब्रम्हताल, लक्ष्मी ताल, गंधर्वी ठेका.

उपशास्त्रीय संगीत : 1 नाट्यगीत.

**टीपः** प्रथम प्रात्यक्षिक परीक्षेमध्ये हार्मोनियम संगतीची परवानगी नाही.

## Suggested Activities:

1. अभ्यासक्रमातील रागांवर आधारित गीते सादर करणे
2. कोणतेही एक नाट्यगीत साभिनय सादर करणे
3. विविध संगीत नाटकांत भूमिका करणाऱ्या गायक नट नटयांची माहिती गोळा करणे.
4. रागांवर आधारित नाटयगीतांची यादी करणे

Practical Paper II
Mazlis Performance (सभा गायन) Credits: 4 Maximum Marks: 100 (80+20)

Course outcomes:

1. विद्यार्थी विलंबित ख्याल कमीतकमी 20 मिनिटे सादर करू शकेल.
2. विद्यार्थ्याला मनाने आलाप गाता येतील.
3. विद्यार्थ्याला तानपुरा मिळवता येईल.
4. विद्यार्थी नाटयगीत सादर करू शकेल.

सभागायन (Mazlis Performance) या परिक्षेचा कालावधी सर्वसाधारणपणे 1 तासाचा राहील.

गुण विभाजन

| | | |
|---|---|---|
| • ऐच्छिक राग गायन | – | 40 गुण |
| • ऐच्छिक संदर्भ रागात छोटाख्यालाचे गायन | – | 15 गुण |
| • परिक्षकांनी विचारलेल्या विस्तृत गायकीच्या 5 रागांपैकी एकात छोटाख्यालाचे गायन | – | 15 गुण |
| • उपशास्त्रीय गायन | – | 10 गुण |
| एकूण | – | 80 गुण |

अंतर्गत मूल्यांकन :

| | | |
|---|---|---|
| • तानपुरा मिळविणे व तानपुरा संगत करणे | – | 10 गुण |
| • प्रात्यक्षिकावर आधारित असाइनमेंट | – | 10 गुण |
| एकूण | – | 20 गुण |

**टीप:** सभागायनामध्ये मैफिलीची रंगत वाढविण्याच्या दृष्टीने हार्मोनियम साथसंगतीची परवानगी आहे. मात्र ही साथसंगत पूरक असावी, प्रेरक नसावी.

Suggested Activities:

1 प्रचलित ताल विविध लयींमध्ये म्हणणे
2 विविध वाद्यांची चित्रे एकत्र करणे
3 तानपुऱ्यांना तारा चढविणे.

Theory Paper I (KS) Credits : 4 Maximum Marks: 100 (80+20)

Course outcomes:

1. विद्यार्थ्यांना शास्त्रीय संगीताच्या प्राचीन स्वरूपाचे ज्ञान होईल.
2. विद्यार्थ्यांना संगीताच्या उपयोजित स्वरूपाचे ज्ञान होईल.
3. विद्यार्थ्यांना महाराष्ट्रातील नाट्यसंगीताची ओळख होईल.

Theory Paper I (क्रियात्मक शास्त्र)

Unit I

- अभ्यासक्रमातील मोठया व छोटया ख्यालाच्या बंदिशी तसेच तराणा, त्रिवट इ. चे स्वरलेखन, आलाप–तान–बोलतानांसहित संपूर्ण ख्यालगायकी स्वरलिपीबद्ध करणे, तसेच ध्रुपद व धमार पटींसह स्वरलिपीबद्ध करणे.
- अभ्यासक्रमातील तालांचे तसेच सर्व प्रचलित तालांचे ज्ञान, तालांना विविध लयकारींमध्ये लिपीबद्ध करणे.

Unit II

- प्रात्यक्षिकासाठी नियोजित रागांचा शास्त्रीय अभ्यास.
- बी. ए. च्या रागांसहित सर्व रागांचा तुलनात्मक अभ्यास, समप्राकृतिक रागांमध्ये फरक दाखविणे, रागांगांच्या स्वरूपाबाबत विभिन्न मते अभ्यासणे.

Unit III

- प्रबंधाची व्याख्या, तत्वे, प्राचीन व आधुनिक प्रबंध प्रकार
- पार्श्वसंगीत (Background Music), वाद्यवृंद (Orchestra), व वृंदगायन.

Unit IV

- नाट्यसंगीतः उगम, विकास, सद्यस्थिती व प्रचलित नाट्यगीतांची समिक्षा.
- नाट्यसंगीत व शास्त्रीय संगीताचा संबंध.

पाचव्या प्रश्नात 8 वस्तुनिष्ठ बहुपर्यायी उपप्रश्न असतील.

## Suggested Activities for Paper I

1. प्राचीन ऋचांचे अथवा मंत्रपठन पद्धतीचे सांगीतिक अध्ययन
2. शास्त्रीय संगीतावर आधारित मराठी नाटयगीतांची यादी तयार करणे.
3. ऑनलाइन उपलब्ध एखादे वृंदवादन ऐकून रसग्रहण करणे.

Theory Paper I (SVG) Credits : 4 Maximum Marks: 100 (80+20)

Course outcomes:

1. ध्वनी विज्ञानाची ओळख होईल.
2. वाद्यसंगीताच्या स्वरूपाचे ज्ञान होईल.
3. पाश्चात्य स्वरसप्तक व कर्नाटकी संगीत यांची ओळख होईल.
4. संगीत विषयक प्राचीन ग्रंथांचा परिचय होईल.

Theory Paper II (संगीतातील विज्ञान व ग्रंथ अभ्यास)

Unit I

- ध्वनीची उत्पत्ती, वहन, व ग्रहण
- आंदोलनसंख्या व वीणेच्या तारेच्या लांबीचा परस्पर संबंध.
- स्वरवाद्यांचे वर्गीकरण व इतिहास
- स्वरवाद्य वादकांची घराणी

Unit II

- भारतीय स्वरसप्तक व यूरोपिअन स्वरसप्तकांचा अभ्यास व तुलना, कॉर्ड्स्, हार्मनी व मेलडी.
- उत्तर हिंदुस्थानी व कर्नाटक संगीताची तुलना.

Unit III

- स्वरप्रस्तार, खंडमेरू व नष्टोद्दिष्ट
- सारणाचातुष्टय
- हवेली संगीत
- अष्टछाप कवींचे योगदान

Unit IV

- संगीतविषयक ग्रंथांचा अभ्यासः
  - नाटयशास्त्र (अध्याय 28 ते 33)
  - बृहद्देशी
  - राग तत्व विबोध
  - हिंदुस्थानी संगीत पद्धती – भाग 1 ते 4

Suggested Activities

1. अभ्यासक्रमातील कोणत्याही एका ग्रंथाचा परिचय लिहून सादर करणे.
2. कोणत्याही पाच स्वरवाद्यांची नामांकित आकृती काढून सादर करणे.
3. कर्नाटकी संगीताची ऑनलाइन मैफल ऐकून रसग्रहण करणे.

## Elective Course (3 credits) : Introduction to Sound System

## Outcomes:

1 विद्यार्थ्याला परंपरागत व आधुनिक तंत्रज्ञानाची ओळख होईल.
2 मायक्रोफोन समोर गातांना विद्यार्थ्याला ध्वनीविषयक विविध पैलूंचे ज्ञान असेल.
3 ध्वनी तंत्रज्ञान विषयक पारिभाषिक शब्दांचे ज्ञान होईल.

Unit I

- मायक्रोफोन चे प्रकार व माहिती
- ध्वनीव्यवस्थेत अंतर्भूत उपकरणे उदा. मिक्सर, स्पीकर, ॲम्प्लिफायर यांची माहिती

Unit II

- सांगीतिक मैफिलीचे ध्वनी संयोजन
- ध्वनी विषयक पारिभाषिक शब्दांचे ज्ञान, उदा. बास, ट्रेबल, मिड, गेन इ.

Unit III

- ध्वनिमुद्रणाचे तंत्रः लाइव्ह ध्वनिमुद्रण व ट्रॅक ध्वनिमुद्रणाची माहिती
- संगीत संयोजन तसेच वाद्यांची निवड बद्दल माहिती

Unit IV

- स्पूल, रेकॉर्ड, कॅसेट, सीडी व डिजिटल साधने यांचा विस्तृत अभ्यास
- ध्वनी व्यवस्थेच्या अंतर्गत येणारे सॉफ्टवेअर ॲप्स इ. आधुनिक तंत्रज्ञानाचा अभ्यास

## Activities:

- ध्वनिविषयक उपकरणांची नामांकित आकृती काढणे.
- महाविद्यालयात होणाऱ्या सांगीतिक कार्यक्रमांत ध्वनी व्यवस्थेत मदत करणे.
- एखाद्या सांगीतिक कार्यक्रमातील ध्वनी व्यवस्थेची माहिती समजून घेणे.
- एखाद्या रेकॉर्डिंग स्टूडिओला भेट देणे.

# M. A. INDIAN MUSIC Examination